PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 10, ISSUE 1

# “महाराष्ट्रातील अल्पभूधारक शेतकऱ्यांचे प्रश्न आणि समस्या”

**डॉ. राजेश्वर डी. रहांगडाले**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख व सहाय्यक प्राध्यापक
राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालय, चिमूर, जि. चंद्रपूर
**महाराष्ट्र भारत**

## प्रास्तावनाः-

भारतीय शेतीची सर्वात मोठी समस्या ही आताचा शेतकरी हा अल्पभूधारक झाला आहे. भारतात शासकीय पातळीवर शेती विषयक मोजमाप नोंद, लागवडीखालील क्षेत्र, ओलिताखालील क्षेत्र, पडीत जमीन इत्यादी ची गणना 1970 पासून चालू आहे. 1970- 71 च्या शेतीविषयक गणनेनुसार, प्रत्येक भारतीय शेतकऱ्याकडे सरासरी 2.28 हेक्टर जमीन होती. हेच प्रमाण 1995 - 96 मध्ये 1.82 हेक्टर आहे. 2010 च्या शेतीविषयक गणनेनुसार एकूण 70 टक्के भारतीय शेतकऱ्यांकडे 1 हेक्टरपेक्षा कमी शेती आहे. म्हणजे आज घडीला 70 टक्के भारतीय शेतकरी अल्पभूधारक आहेत. भारतातील एकूण लागवडीखालील क्षेत्रापैकी 44 टक्के क्षेत्रावर अल्पभूधारक शेतकरी शेती करतात, आणि देशातील अन्नधान्याच्या जवळपास सर्व गरजा पूर्ण करतात . अल्पभूधारक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पन्नावर मिळणारा नफा मात्र नाममात्र आहे.

भारतीय शेतीमध्ये आमूलाग्र बदल घडवायचा असेल तर सर्वप्रथम, अल्पभूधारक शेतकऱ्यांची स्थिती सुधारली पाहिजे. देशातील 96 टक्के अल्पभूधारक शेतकरी हा ग्रामीण भागातील आहे. ग्रामीण भागात तंत्रज्ञानाचा अभाव, भांडवलाची कमतरता, लहरी हवामान, बेभरवशाचा मानसून, सुसज्ज बाजारपेठेचा अभाव, शेतीला योग्य बाजार भाव न मिळणे व इतर काही समस्या कडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. याबरोबरच शेतकऱ्यांना उत्कृष्ट प्रतीचे बियाणांची उपलब्धता करून देणे, हवामानातील बदलाचे अद्यावत माहिती मिळणे, शेतातील यांत्रिकीकरण वाढवणे व शेती विषयक सरकारी धोरणांचा फायदा शेतकऱ्यांना मिळवून देणे हेही तेवढेच महत्त्वाचे आहे.

महाराष्ट्र राज्यात 73 टक्के शेतकरी अल्प आणि अत्यल्प भूधारक आहेत. शेतीपासून मिळणाऱ्या उत्पादनावर त्यांचा आणि कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालवणे त्यांना कठीण होत चालले आहे. उत्पन्नासाठी केवळ पिकांवर अवलंबून राहिल्याने शेती करणे अधिक जोखीमीचे ठरत आहे. शेतीतील धोके ओळखून शेतीला पूरक घटकांचा विचार केला पाहिजे. प्रत्येक पिढीला जमीन कमी होत चालली आहे. त्यामुळें यांत्रिक शेती, ट्रॅक्टर, सुधारीत औजारे कमी क्षेत्रासाठी वापरणारे त्याला शक्य होत नाही. बदलत्या हवामानानुसार सतत उदभवणारी दुष्काळी परिस्थिती, पाणी टंचाई, अतिवृष्टी, गारपीठ, अवकाळी पाऊस आणि शेतमालाचे हमीभाव यासारख्या समस्यांमुळे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढत आहे.

अल्पभूधारक म्हणजे काय?

पाच एकर किंवा त्यापेक्षा कमी जमीन असलेले शेतकरी अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या अंतर्गत येतात. अल्पभूधारक शेतकरी श्रीमंती आणि मध्यम शेतकरी यांच्या मध्ये आहेत. त्यांच्याकडे जमीन मर्यादित आहे आणि कृषी उत्पादन कमी आहे. कमी जमीन धारण आणि जास्त खर्च यामुळेच शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. जास्तीचे उत्पन्न मिळवण्यासाठी मजूर म्हणून कुठेतरी काम करणेही त्यांना कठीण जात आहे.

**शेतकऱ्यांच्या समस्या आणि अडचणीः-**

1. **असंघटित शेती**

लागवड सिंचन तोडणी व पणन याकरीता पद्धतशीर नियोजन नाही. सरकारने ठरवलेली किमान खरेदी किंमत गरीब शेतकऱ्यापर्यंत पोहचत नाही.

2. **लहान शेतजमीन**

स्वातंत्रोत्तर काळानंतर कुटुंबातील अधिक संख्येमुळे जमीन लहान तुकडयांमध्ये विभागली गेली. अशा लहान क्षेत्राची लागववाद करणे आर्थिकदृष्ट्या शक्य नाही. असे छोटे शेतकरी असुरक्षित बनले आहेत. काही प्रकरणांमध्ये शेतकरी जमीन मालक नाहीत ज्यामुळे फायदेशीर शेती करणे अशक्य होते. कारण कमाईचा महत्वपूर्ण भाग जमीन मालकांसाठी भाडे देण्यासाठी वापरला जातो.

3. **सिंचन सुविधांचा अभाव**

केवळ मर्यादित भाग सिंचनाखाली असल्याकारणामुळे बहुतेक जमीन दु:ष्काळी परिस्थितीत आहे. या अल्पभूधारक शेतकऱ्यांमध्ये पीक पिकवण्याबाबत कोणतीही योजना आहे.

**4. शासकीय योजना / कार्यक्रम**

शासकीय योजना ह्या सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहचत नाही. सरकारने कृषी कर्ज, कर्जमाफी आणि कर्ज लागू केली आहेत. केंद्र व राज्य सरकारने जाहीर केलेल्या बहुतेक सबसिडी आणि योजना गरीब शेतकऱ्यांपर्यंत पोहचत नाहीत. याउलट या योजनांचा फायदा फक्त मोठ्या जमीनधारकांना होतो.

**5. खेड्यांमधील बेरोजगारी**

शेतकऱ्यांचे कुटुंब हे हंगामी शेतीवर अवलंबून आहे. तसेच त्यांना शेती पूरक व्यवसाय नाकारल्या कारणाने बेरोजगारीचे प्रमाण खेड्यांमध्ये वाढत आहे.

**अल्पभूधारक शेतकरी योजनाः-**

1. **मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना**

मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेअंतर्गत राज्य सरकारकडून नवीन पंप किंमतीच्या 95 टक्के अनुदान दिले जाते. मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना संपूर्णपणे महाराष्ट्र राज्य शासनाची योजना आहे. योजनेअंतर्गत टप्प्या टप्प्याने एक लाख सौर कृषीपंप आस्थापित करण्याचा शासनाचा उद्देश आहे. पहिल्या टप्प्यात 25000 सौर कृषी पंप, दुसऱ्या टप्प्यात 50000 सौर कृषी पंप आणि तिसऱ्या टप्प्यात 25000 सौर कृषी पंप आस्थापित करण्याचे शासनाचे उद्देष्ट आहे.

### 2. एक शेतकरी एक डी पी योजना

एक शेतकरी एक डीपी योजनेअंतर्गत एक शेतकरी ट्रान्सफॉर्मर दिले जात आहे. शेतकऱ्यांना अनियमित वीज आणि वीजेमुळे जीवघेणा धोक्यात येऊ नये उभा सर्व बाबींचा विचार करून एच व्ही डी एस ला उच्च दाबाची वीज देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. योजनेचा आतापर्यंत 90 हजार शेतर्कयांना लाभ झाला आहे. 11347 कोटींच्या या योजनेसाठी निधी मंजूर झाला आहे. महावितरण कंपनीला आशियाई विकास बँकेकडून कर्ज घेऊन 2248 कोटी रुपयांचा आर्थिक निधी वितरित करण्यात येणार आहे.

### 3. ट्रॅक्टर अनुदान योजना महाराष्ट्र

ट्रॅक्टर अनुदान योजनेअंतर्गत कृषीविषयक अवजारे आणि यंत्रे पुरवण्यासाठी शेतकऱ्यांना 50 टक्के अर्थसहाय्य केले जाते. यामध्ये ट्रॅक्टर, पॉवर टिलर, बैल चालवणारी यंत्रे / अवजारे, बागायती यंत्रे, स्वयंचलित डिव्हाइस, पीक काढणी यंत्र, ट्रॅक्टर / पॉवर टिलर जंगम उपकरणे इत्यादि यंत्रे आणि अवजारे समाविष्ट आहेत. राज्यसरकारच्या या योजनेमुळे शेतकऱ्यांना शेतीची कामे कमी वेळेत होण्यासाठी लाभ होणार आहे. या योजनेअंतर्गत महाराष्ट्र सरकारने कृषी यांत्रिकरणांला अधिक प्राधान्य दिले आहे.

### 4. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना

महाराष्ट्र राज्य शासनानाने शेतीसाठी पाण्याचा योग्य वापर व्हावा यासाठी सूक्ष्म सिंचन योजना अल्प आणि अत्यल्प शेतकऱ्यांसाठी राज्यभरात राबवली. शेतकऱ्याला या योजनेमुळे अधिक उत्पादन करण्याच्या

दृष्टीने प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना आणि तुषार सिंचन योजना राबवली जात आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेसाठी अल्प आणि अत्यल्प भूधारक शेतकÚयांना 55 टक्के अनुदान मिळत आहे. इतर प्रवर्गातील शेतकऱ्यांना 45 टक्के अनुदान देण्यात येते.

उपाय:-

1. पहिली गोष्ट जर तुम्ही एका पेक्षा जास्त भाऊ असाल तर अगोदरच लक्षात ठेवा की कधी ना कधी तुमचा भाऊ तुमच्यापासून अलग होणार, तेव्हा तुम्ही हा विचार करा त्यावेळेला तुमच उत्पन्न अर्ध होणार आणि त्यातच तुमचा मुलगा किंवा मुलगी शिकत असेल तर त्यांच शिक्षण तुम्ही कस करणार आणि सोबत घर खर्च आणि शेती खर्च सुद्धा कसा धकवणार.

2. गरज नसताना शेतीत वायफळ खर्च करू नये. म्हणजे पैसे नसताना वार्षिक 10,000 रुपये जास्तीचे कमावण्यासाठी 1.5-2 लाख खर्च करू नका.

3. एका पिकावर किती खर्च होतो आणि ते विकून किती पैसे आले याची वजा करून नका किती उरला हे पाहण्याची सवय करावी.

4. पीक यायच्या अगोदर त्याचे जास्तीत जास्त किती पैसे येतील हे गृहीत धरण्यापेक्षा कमीत कमी किती पैसे येतील हा अंदाज लावला. कारण जर तुम्ही जास्तीत जास्त पकडले तर तुमच्या मनात ती रक्कम घर करून बसणार त्यामुळे तुम्ही मग वायफळ खर्च करणार कारण तुम्ही हे पकडलेले असते की मला एवढे येतीलच, कधी कधी तुम्ही व्याजाने पण पैसे काढून काम करणार किंवा काही विकत घेणार. कारण शेती ही निसर्ग आणि भावा वर चालते आणि दोन्ही ही गोष्टी आपल्या हातात नाहीत.

5. प्रत्येक पिकाच्या उत्पादनामधून काही ठराविक रक्कम बाजूला काढत जा.

6. सावकारी कर्ज घेतेवेळी त्याचे वर्षाला किती द्यावे लागतील याचा हिशोब करत जा. भावनेच्या भरात येऊन किती पण टक्क्याने घेऊ नये.

7. भाव वाढतील या आशेवर घरी एखाद पीक ठेऊ नका. तेव्हाच आहे त्या भावात विकून ते पैसे बँकेत FD करून ठेवले तर जास्त पैसे येतील. किती भाव वाढला तर किती पैसे येतील आणि FD मध्ये ठेवले तर किती पैसे येतील याचा विचार करावा.

## संदर्भ ग्रंथ:-

1. विपणन आणि व्यवस्थापन डॉ. सदाशिव शिवगवे, प्रा. दिपक सुरवसे, सक्सेस प्रकाशन, जुन 2015.

2. भारतीय अर्थव्यवस्था, भालेराव आणि देसाई, निराली प्रकाशन.

3. भारतीय अर्थव्यवस्था, दत्त आणि सुंदरम्, एस. चंद. कंपनी लि. नई दिल्ली.

4. कृषी अर्थशास्त्र, डॉ. निता वाणी, प्रशांत पब्लिकेशन, जळगांव.

5. कृषी अर्थशास्त्र, डॉ. विजय कवी मंडन, मंगेश प्रकाशन, नागपूर.

6. कृषी अर्थशास्त्र, डॉ. एस. बी. कटमुसरे, पिंपळापुरे अँन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.